13 MAY 2017 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अपेक्षा न ठेवता सकारात्मक राहा

## कुलगुरू डॉ. शिंदे : फेस्कॉमच्या आनंद मेळाव्यास सुरवात

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : 'कोणाकडूनही कसलीही अपेक्षा ठेवू नका. अपेक्षाभंगामुळे एकाकी व्हायला होतं. एकवेळ शारीरिक व्याधी आपण सहन करू शकतो; पण एकाकीपणाचे दु:ख भयानक असते. म्हणून या सर्वांपासून बाजूला या. जीवनातील अनुभवाची शिदोरी घेऊन उर्वरित आयुष्य सकारात्मक ऊर्जेच्या साह्याने सुख, समाधानानं व्यतित करा. आनंदी राहा'', असा सल्ला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिला.




**कोल्हापूर : महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघातर्फे शुक्रवारी शाहू स्मारक भवनात आयोजित आनंद मेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.** **(नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघातर्फे (फेस्कॉम) आजपासून आनंद मेळावा सुरू झाला. शाहू स्मारक भवनात मेळावा सुरू आहे. कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते रौप्यमहोत्सवी मनोहारी मनोयुवा विशेषांकाचे प्रकाशन, आनंद मेळाव्याचे उद्‌घाटन झाले. 'फेस्कॉम'चे अध्यक्ष द. तु. चौधरी अध्यक्षस्थानी होते.

डॉ. शिंदे म्हणाले, ''अनेकदा आयुष्यात सर्वकाही मिळते; पण आनंद कधीकधी अनेक कारणांनी मिळत नाही. म्हणून हा आनंद मेळावा तुम्हाला जगण्याची नवी ऊर्मी, नवा विचार, नवी दिशा देईल.''

प्राचार्य एस. डी. साळुंखे यांनी स्वागत केले. प्राचार्य य. ना. कदम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एच. व्ही. देशपांडे यांनी परिचय करून दिला. स्थानिक समितीचे अध्यक्ष प्राचार्य व्ही. डी. माने यांनी आभार मानले.

अकोला येथील विनायक पांडे यांनी तुतारीप्रमाणे शंखनादाने कार्यक्रमात रंगत आणली. प्रथम सत्रात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पी. एम. चौगुले यांनी मार्गदर्शन केले.

सुरेश मिरजकर यांनी स्वागत केले. फेस्कॉम कोल्हापूर प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. मानसिंगराव जगताप अध्यक्षस्थानी होते. शाहीर आझाद नायकवडी यांच्या शाहिरीचा कार्यक्रम झाला. मेळाव्यातील प्रतिनिधींनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला.

### आजचे कार्यक्रम

उद्या (ता. १३) प्रथम सत्रात डॉ. अभिजित गुणे रोबोटिक सांधेरोपण शस्त्रक्रिया यावर फिल्मद्वारे सादरीकरण, द्वितीय सत्रात डॉ. धनंजय गुंडे यांचे 'टेन्शन बॉम्ब- जणू अणुबॉम्ब' यावर व्याख्यान होईल. तृतीय सत्रात इंद्रजित देशमुख यांचे 'वृद्धाश्रम- एक नवा आयाम' यावर, चतुर्थ सत्रात प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे 'ज्ञानदिन लावू जगी, नाचू आनंदाचे रंगी' यावर विचार मांडतील.

13 MAY 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आव्हाने स्वीकारून सुखी जीवन जगा : डॉ. शिंदे

## मनोहारी मनोयुवा आनंद मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिकांसमोर वाढत्या वयाबरोबर शारीरिक, मानसिक, आर्थिक, वैद्यकीय आव्हाने उभी राहतात. इतरांकडून अपेक्षा न करता स्वत:कडून अपेक्षा ठेवून बदल स्वीकारून जीवन सकारात्मक पद्धतीने सुखी जीवन जगता येईल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मनोहारी मनोयुवा आनंद मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी फेस्कॉमचे अध्यक्ष द. तु. चौधरी होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मनोहारी मनोयुवा या मुखपत्राने ज्येष्ठांसाठी महत्त्वपूर्ण कार्याचा टप्पा पार केला आहे. याच्या माध्यमातून ज्येष्ठांची चळवळ प्रभावीपणे ठेवली आहे. ज्येष्ठ नागरिक निवृत्तीनंतर सामाजिक बांधिलकी, जबाबदारी स्वीकारून कार्य करीत आहेत. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या सान्निध्यात आल्यावर माया, प्रेमाची ऊब मिळाल्याची अनुभूती मिळते.




**कोल्हापूर : मनोहारी मनोयुवा आनंद मेळाव्यात बोलताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. सोबत अनिल कासखेडीकर, प्राचार्य य.ना.कदम, द.तु.चौधरी, दि.ना.चापके, नाना शिंदे, एस.डी. साळुंखे आदी.** (छाया : पप्पू आतार)

उतारवयात शारीरिक वृद्धत्व थांबविता येत नाही, परंतु सकारात्मक विचाराने मेंदूचे वृद्धत्व थांबविले पाहिजे. २०३० मध्ये भारत महासत्ता होणार आहे. देशात तरुणांची संख्या जास्त असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांनी केलेले कार्य तरुणांना प्रेरणादायी ठरेल. अशा प्रकारचे आनंद मेळावे ज्येष्ठांना नवी उर्मी, ऊर्जा देतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

विनायक पांडे यांनी शंखनाद केला. गुरुनाथ हेर्लेकर यांनी प्रार्थना गीत गायले. फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल कोल्हापूरचे अध्यक्ष प्राचार्य एस. डी. साळुंखे यांनी स्वागत केले. प्राचार्य य. ना. कदम यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एच. व्ही. देशपांडे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिवाजीराव हिलगे यांनी आभार मानले. यावेळी आयस्कॉनचे अध्यक्ष दि. ना. चापके, प्रा. एन. एन. जोशी, नाना शिंदे, व्ही. डी. माने, प्रा. श्रीपाल जर्दे, एस. डी. पारखे, चेलनादेवी खुरपे, के. बी. गुरव, एस. डी. पाटणे आदी उपस्थित होते. दुपारच्या सत्रात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पी. एम. चौगुले यांचे 'आनंदाचे डोही' विषयावर व्याख्यान झाले. द्वितीय सत्रात डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी 'मेंदूचे वृद्धत्व' विषयावर मार्गदर्शन केले. सायंकाळी शाहीर आझाद नायकवडी यांचा पोवाड्याचा कार्यक्रम व 'लाडक्या, निरोप मिळाला' ही लघुनाटिका सादर झाली. शनिवार (दि.१२) खा. संभाजीराजे छत्रपती, विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या उपस्थितीत मेळाव्याचा समारोप होणार आहे.

1 3 MAY 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सकारात्मकतेने वृद्धत्वाला सामोरे जा : डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी:** प्रत्येक माणसाच्या आयुष्यात वृद्धापकाळ हा येतच असतो. तो कोणालाही चुकलेला नाही. वृद्धापकाळाचा बाऊ करण्यापेक्षा प्रत्येकाने त्याकडे सकारात्मक नजरेने पाहुन त्याला सामोरे जाणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. आनंद मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

शुक्रवारी शाहू स्मारक भवन येथे मनोहारी मनोयुवा आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटन देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी द. तु. चौधरी होते.

देवानंद शिंदे म्हणाले, गेल्या काही वर्षामध्ये काही सामाजिक संस्था ज्येष्ठ नागरिकांच्या चळवळी प्रभावीपणे राबवत आहेत. ज्येष्ठ नागरिकांकडून प्रेम आणि मायेची अनुभूती मिळते. पी. डी. माने यांनी आभार मानले. यावेळी, अनिल सरवडीकर, प्रा. य. ना. कदम, डी. एन. चापके, प्राचार्य एस. डी. साळुंखे, द. तु. चौधरी आदींसह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

13 MAY 2017 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'क्विक-हिल'शी शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**




शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग व अँटीव्हायरस कंपनी क्विक-हिल यांच्यात पुणे येथे सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर व क्विक-हिलच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

सामंजस्य कराराअंतर्गत विविध तरतुदींची माहिती देताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, या करारान्वये कॉम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन सायबर सिक्युरिटीचा अभ्यासक्रम शिकता येणार आहे. नोकरीच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान देण्यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आयोजित करण्यात येणार आहे. डॉ. मुधोळकर म्हणाले, सायबर अवेरनेस लिटरसी सेलच्या माध्यमातून सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती केली जाणार आहे. क्विक-हिल फौंडेशनतर्फे संगणकशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना सायबर साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जाईल. हे प्रशिक्षणार्थी कमवा आणि शिका उपक्रमांतर्गत इतर शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांत सायबर साक्षरतेबद्दल जनजागृती करतील. सध्या सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर या जनजागृतीमुळे युवावर्ग या गुन्ह्यांना बळी पडणार नाही. अशा प्रकारचे गुन्हे कमी करण्यात निश्चित यश येईल, असेही ते म्हणाले.

यावेळी डॉ. आर. आर. मुधोळकर, डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रा. के.जी. खराडे, अजय शिर्के, सी.एस.आर. हेड सुगंधा दाणी आदी उपस्थित होते.

11 3 MAY 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा 'क्विक-हिल'शी सामंजस्य करार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग आणि अग्रमानांकित अँटी व्हायरस कंपनी क्विक-हिल यांच्या दरम्यान नुकताच पुणे येथे सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी, तर क्विक-हिलच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर यांनी स्वाक्षऱ्या केल्या.



या सामंजस्य कराराअंतर्गत विविध तरतुदींची माहिती देताना कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, या करारान्वये कॉम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन सायबर सिक्युरिटीचा अभ्यासक्रम शिकता येणार आहे. तसेच नोकरीच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान अवगत करण्यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम आयोजित करण्यात येणार असून त्याचे प्रादेशिक केंद्र विद्यापीठाचा संगणकशास्त्र विभाग असेल. या केंद्राच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणाचा उद्देश माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार करणे हा असेल. माहिती तंत्रज्ञान सुरक्षा उद्योगाच्या मापदंडाप्रमाणे सी, सी++ या प्रोग्रॅमिंग भाषांचे व्यावसायिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणार असल्याने विद्यार्थी रोजगारक्षम होतील, अशी अपेक्षा कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी व्यक्त केली. या सामंजस्य करारासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचेही त्यांनी सांगितले.

संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. आर. मुधोळकर म्हणाले, सायबर अवेअरनेस लिटरसी सेलच्या (सीएएलसी) माध्यमातून सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती केली जाणार आहे. यामध्ये क्विक-हिल फौंडेशनतर्फे संगणकशसत्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना सायबर साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जाईल. हे प्रशिक्षणार्थी 'कमवा आणि शिका' उपक्रमाअंतर्गत इतर शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये सायबर साक्षरतेबद्दल जनजागृती करतील. सध्या सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर या जनजागृतीमुळे युवावर्ग या गुन्ह्यांना बळी पडणार नाही आणि अशा प्रकारचे गुन्हे कमी करण्यात यश येईल.

यावेळी डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रा. के. जी. खराडे, क्विक-हिलचे सीएसआर व्यवस्थापक अजय शिर्के, सीएसआर हेड सुगंधा दाणी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 MAY 2017

सकाळ

## विद्यापीठ 'क्विक-हिल' यांच्यात सामंजस्य करार

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग व अग्रमानांकित अँटीव्हायरस कंपनी 'क्विक-हिल' यांच्यात पुणे येथे सामंजस्य करार झाला. विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी तर क्विक-हिलतर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश काटकर यांनी करारावर स्वाक्षरी केल्या. करारान्वये कॉम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थ्यांना मोफत



पान २ वर »

## विद्यापीठ - 'क्विक-हिल' यांच्यात सामंजस्य करार

» पान १ वरून

ऑनलाइन सायबर सिक्युरिटीचा अभ्यासक्रम शिकता येईल. नोकरीच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्राध्यापकांना ज्ञान अद्ययावत करण्यासाठी 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे प्रादेशिक केंद्र विद्यापीठाचा संगणकशास्त्र असेल. केंद्राच्या माध्यमातून संलग्नीत महाविद्यालयांतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणाचा उद्देश माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार करणे हा असेल. माहिती तंत्रज्ञान सुरक्षा उद्योगाच्या मापदंडाप्रमाणे सी, सी++ या प्रोग्रॅमिंग भाषांचे व्यावसायिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणार असल्याने विद्यार्थी रोजगारक्षम होतील, अशी अपेक्षा कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी व्यक्त केली. करारासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मार्गदर्शन मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

सायबर अवेरनेस लिटरसी सेलच्या सी.ए.एल.सी. माध्यमातून सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती केली जाणार आहे. यामध्ये क्विक-हिल फाउंडेशनतर्फे संगणकशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना सायबर साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जाईल. हे प्रशिक्षणार्थी 'कमवा आणि शिका' उपक्रमांतर्गत शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांत सायबर साक्षरतेबद्दल जनजागृती करतील, असे संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी स्पष्ट केले. या प्रसंगी डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रा. के. जी. खराडे, क्विक-हिलचे सी. एस. आर. व्यवस्थापक अजय शिर्के, सुगंधा दाणी उपस्थित होते.

13 MAY 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संगणकशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या कौशल्याला मिळणार बळ

## शिवाजी विद्यापीठाचा 'क्विक-हिल' समवेत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगणक शास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांच्या कौशल्याला बळ मिळणार आहे. त्यासाठी संगणक शास्त्र विभाग आणि 'क्विक-हिल' या कंपनीमध्ये पुणे येथे सामंजस्य करार करण्यात आला.

या करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी आणि 'क्विक-हिल'च्यावतीने व्यवस्थापकीय संचालक कैलाश काटकर यांनी स्वाक्षरी केल्या. त्यानंतर कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, या करारान्वये संगणक शास्त्राच्या विद्यार्थ्यांना मोफत ऑनलाईन सायबर सिक्युरिटीचा अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता येणार आहे. या करारासाठी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे मार्गदर्शन लाभले. संगणकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी यावेळी सायबर गुन्हेगारीबाबत सायबर साक्षरतेचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमास डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रा. के.जी. खराडे, क्वि क-हिलचे सी.एस.आर. व्यवस्थापक अजय शिर्के, सी. एस.आर. हेड सुगंधा दाणी आदी उपस्थित होते.

### विद्यापीठात प्रादेशिक केंद्र

प्राध्यापकांना अद्ययावत ज्ञान अवगत करण्यासाठी 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम' आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे प्रादेशिक केंद्र विद्यापीठाचा संगणकशास्त्र असेल. या केंद्राच्या माध्यमातून संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाईल. माहिती-तंत्रज्ञान सुरक्षा उद्योगाच्या मापदंडाप्रमाणे 'सी', 'सी प्लस प्लस' या प्रोग्रॅमिंग भाषांचे व्यावसायिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणार असल्याने विद्यार्थी रोजगारक्षम होतील, असे कुलसचिव नांदवडेकर यांनी सांगितले.